| | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | : ०६/०४/२०२४ |
| | नोंदणी तारीख | : २९/०४/२०२४ |
| | निकाल तारीख | : १०/०७/२०२६ |
| | कालावधी | : वर्ष महिना दिवस<br>०२ ०३ ०४ |

**सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर जि. वाशिम यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी : एस. पी. बेदरकर )**

**नियमीत दिवाणी दावा क्र.३६/२०२४.** **निशाणी क्र. : २८**

**(CNR No.MHWS050001672024)**

१) वच्छलाबाई देविदास राठोड,
वय – ५४ वर्षे, व्यवसाय – शेती,

२) शंकेश्वर देविदास राठोड,
वय – ३६ वर्षे, व्यवसाय – शेती,

३) आशिष देविदास राठोड,
वय – ३१ वर्षे, व्यवसाय – शेती,

४) रोशनी भारत पवार,
वय – ३४ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
सर्व रा. आमदरी, ता. मानोरा, जि.वाशिम. **... वादी**

10.07.26.

**विरुध्द**

महाराष्ट्र शासनतर्फे
जिल्हाधिकारी वाशिम जिल्हाधिकारी कार्यालय
वाशिम, जि. वाशिम **... प्रतिवादी**

**दावा : देविदास भोपा राठोड हे मृत असल्याचे घोषीत करुन त्याप्रमाणे आदेश व हुकूमनामा पारीत होणेबाबत...**

---

**वादीतर्फे विधीज्ञ – श्री. टी. ए. खान पटेल**

**प्रतिवादीविरुद्ध एकतर्फा**

---

## न्यायनिर्णय

**( जाहीर दिनांक : १० जुलै, २०२६ )**

वादींनी प्रस्तुतचा दावा देविदास भोपा राठोड हे मृत असल्याचे घोषीत करुन त्याप्रमाणे आदेश व हुकूमनामा पारीत होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२) वादींचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, वादी क्र.१ चे पती व वादी क्र.२ ते ४ यांचे वडील नामे देविदास भोपा राठोड हे आमदरी, ता. मानोरा, जि. वाशिम येथील रहिवासी होते. देविदास भोपा राठोड यांच्या नावाने मौजा आमदरी, ता. मानोरा, जि. वाशिम येथे गट क्र.२५/२ क्षेत्रफळ २.३० हे.आर., आकार १ रु.६९ पै., हिस्सा पुर्ण अशी शेतजमीन आहे.

३) वादींचे पुढील कथन असे आहे की, वादी क्र.१ चे पती व वादी क्र.२ ते ४ यांचे वडील देविदास भोपा राठोड हे दि.१५/०५/२०१५ बेपत्ता असून वादी क्र.३ आशिष देविदास राठोड यांनी दि.१५/०५/२०१५ रोजी पोलीस स्टेशन मानोरा येथे रिपोर्ट दिला असून तेव्हापासून अद्यापपर्यंत घरी परत आलेले नाही. तसेच देविदास भोपा राठोड हे लापता असल्याची जाहिरात दि.१४/०५/२०२३ रोजी दैनिक सायरन या वृत्तपत्रामध्ये सुद्धा प्रकाशित करण्यता आलेली आहे. परंतु देवि दास भोपा राठोड अद्यापपर्यंत घरी आलेले नाहीत.

४) वादींनी असे कथन केले आहे की, वादी क्र.१ चे पती व वादी क्र.२ ते ४ यांचे वडील देविदास भोपा राठोड हे जवळपास ८ वर्ष १० महिन्यांपासून बेपत्ता आहे. तसेच त्यांना तेव्हापासून आजपर्यंत कोणीही बघीतलेले नाही. सबब देविदास भोपा राठोड हे कायदेशीरदृष्टया मृत झालेले आहे असे गृहित धरुन

दि.१६/०१/२०२४ रोजी तहसिलदार मानोरा तसेच दि.१९/०१/२०२४ रोजी तलाठी आमदरी व मंडळ अधिकारी शेंदुरजना यांना वादी क्र.१ ते ४ हे देविदास भोपा राठोड यांचे कायदेशीर वारस असल्याने देविदास भोपा राठोड हे दि.१५/०५/२०१५ पासून बेपत्ता असल्याने गट क्र.२५/२ मध्ये वारसांची नोंद घेण्याबाबत अर्ज दिला होता. परंतु तलाठी मौजा आमदरी यांनी मयत देविदास भोपा राठोड यांचे मृत्यूप्रमाणपत्र असल्याशिवाय ७/१२ उता-यावर महसूलदप्तरी वादी क्र.१ ते ४ यांची वारस म्हणून नोंद रुजू करु शकत नाही असा दाखला दि.१९/०१/२०२४ रोजी सहीशिक्यानिशी दिला.

५) वादींनी असे कथन केले आहे की, वादीं यांनी त्यांच्या वकीलामार्फत दि.२९/०१/२०२४ रोजी प्रतिवादी यांना रजिस्टर पोस्टाद्वारे नोटीस पाठविली होती. सदर नोटीस प्रतिवादीला दि.३०/०१/२०२४ रोजी प्राप्त झाली. परंतु नोटीसप्रमाणे मुदत संपल्यानंतरही प्रतिवादीकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून वादींना प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले आहे.

६) प्रतिवादी यांना सदर प्रकरणाची नोटीसची बजावणी होवून देखील प्रकरणामध्ये हजर झाले नाही. त्यामुळे दि.२४/०४/२०२६ रोजी निशाणी क्र.१ खाली आदेश पारीत करुन प्रकरण प्रतिवादीविरुद्ध एकतर्फा चालविण्यात आले.

७) वादींचे दाव्यातील वादकथन आणि वादींच्या विधीज्ञांचा युक्तिवाद विचारात घेतला असता माझे विचारार्थ खालील मुद्दे निघाले व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १] | वादींनी असे सिद्ध केले आहे काय की, देविदास भोपा राठोड हे दि.१५/०५/२०१५ रोजीपासून बेपत्ता आहेत ? | होकारार्थी |
| २] | मागणीप्रमाणे वादी हे देविदास भोपा राठोड हे मृत असल्याचे घोषित करुन त्याप्रमाणे आदेश व हुकूमनामा मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३] | हुकूमनामा व आदेश काय ? | ... अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ३ बाबत** :-

८) वादींनी त्यांचे कथन सिद्ध करण्याच्या अनुषंगाने वादी साक्षीदार क्र.१ आशिष देविदास राठोड यांचा पुरावा निशाणी क्र.१२ अन्वये नोंदविला. वादींनी त्यांच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ मानोरा पोलीस स्टेशनमध्ये दिलेली तक्रार निशाणी क्र.१३, दैनिक सायरन दि.१४/०५/२०२३ मधील हरविल्याचे वृत्त निशाणी क्र.१४, तलाठी यांना दिलेले पत्र निशाणी क्र.१५, तलाठी यांना दिलेला अर्ज दि.१६/०१/२०२४ निशाणी क्र.१६, तलाठी यांनी दिलेला दाखला निशाणी क्र.१७, जिल्हाधिकारी यांना दि.२९/०१/२०२४ रोजी पाठविलेली नोटीस निशाणी क्र.१८, पोस्टाची पावती निशाणी क्र.१९, पोस्टाची पोहोच पावती निशाणी क्र.२०, आधारकार्डच्या प्रती अनुक्रमे निशाणी क्र.२१ ते २५ व दैनिक सायरन दि.१६/०२/२०२५ मधील जाहिर सूचना निशाणी क्र.२६ इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

10.07.26.

९) वादींतर्फे वादी साक्षीदार क्र.१ आशिष देविदास राठोड यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी दाव्यातील कथनांप्रमाणेच कथने केली आहेत. त्यांच्या पुराव्यावरुन असे दिसते की, श्री. देविदास भोपा राठोड हे वादी क्र.१ चे पती व वादी क्र.२ ते ४ चे वडील होते. ते दिनांक १५/०५/२०१५ रोजीपासून बेपत्ता आहेत. या संदर्भात वादी क्र.३ आशिष यांनी दिलेली मानोरा पोलीस स्टेशनची तक्रार निशाणी क्र.१३, दैनिक सायरन दि.१४/०५/२०२३ मधील हरविल्याचे वृत्त निशाणी क्र.१४, तलाठी यांना दिलेले पत्र निशाणी क्र.१५, तलाठी यांना दिलेला अर्ज दि.१६/०१/२०२४ निशाणी क्र.१६, तलाठी यांनी दिलेला दाखला निशाणी क्र.१७, जिल्हाधिकारी यांना दि.२९/०१/२०२४ रोजी पाठविलेली नोटीस निशाणी क्र.१८, पोस्टाची पावती

निशाणी क्र.१९, पोस्टाची पोहोच पावती निशाणी क्र.२०, आधारकार्डच्या प्रती अनुक्रमे निशाणी क्र.२१ ते २५ व दैनिक सायरन दि.१६/०२/२०२५ मधील जाहिर सूचना निशाणी क्र.२६ इ. कागदपत्रांचे अवलोकन केल्यास स्पष्टपणे दिसून येते की, श्री. देविदास भोपा राठोड हे दिनांक १५/०५/२०१५ पासून बेपत्ता झाले आहेत. त्यांना आजतागायत कोणीही बघितलेले नाही. पुरावा कायदा कलम १०८ (भारतीय साक्ष अधिनियम कलम ११०) नुसार एखादी व्यक्ती ७ वर्षे सतत बेपत्ता असेल आणि त्या व्यक्तीबाबत नैसर्गिकरीत्या माहिती असणा-या लोकांकडूनही कोणतीही माहिती उपलब्ध न झाल्यास ती व्यक्ती मृत झाली आहे असे गृहितक न्यायालय काढू शकते. आपल्या समोरील प्रकरणात वादी हे श्री. देविदास भोपा राठोड यांचे कुटूंबीय आहेत. त्यांना त्यांच्याबद्दल माहिती असणे अपेक्षीत होते परंतु त्यांनीच पुराव्याच्या आधारे देविदास हे गेल्या ७ वर्षपेक्षा जास्त कालावधीपासून बेपत्ता असल्याचे सांगितले. त्याशिवाय इथे हे ही लक्षात घेतले पाहिजे की, वादीच्या दाव्याला प्रतिवादी किंवा इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने आव्हाहन दिलेले नाही. त्यामुळे ते सध्या मयत आहे असेच गृहित धरावे लागेल.

१०) श्री. देविदास भोपा राठोड यांच्या नावे मौजे आमदरी, ता. मानोरा, जि. वाशिम या ठिकाणी गट क्र.२५/२ क्षेत्रफळ २.३० हे. आर. ही शेतजमीन आहे. वादी यांना सदर जमीनीबाबत महसूली अभिलेखात आपल्या नावे वारस म्हणून नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यांनी त्यासंदर्भात मौजे आमदरीच्या तलाठयांना अर्ज देखील दिला होता. परंतु सदर देविदास यांचे मृत्यूप्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांची नोंद होवू शकली नाही. त्यामुळेच वादी यांना हा दावा दाखल करण्यास कारण उद्भवले आहे.

१०.०७.२६.

११) उपरोक्त चर्चेवरुन मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, वादी यांनी श्री. देविदास भोपा राठोड हे गेलया ७ वर्षापासून बेपत्ता असल्याची बाब पुराव्यानिशी सिद्ध केली आहे. त्यामुळे त्यांना मागणी केल्याप्रमाणे देविदास मृत पावल्याची घोषणा मिळविण्याचा अधिकार आहे. त्यानुसार मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी असे नोंदवून मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादींचा दावा मंजूर करण्यात येत आहे.

२. देविदास भोपा राठोड हे दिनांक १५/०५/२०१५ पासून न्यायिक दृष्टया मृत पावल्याचे घोषित करण्यात येत आहे.

३. दाव्याचा खर्च वादी यांनी सोसावा.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

१०.०७.२६.

स्थळ : मंगरुळपीर.
दिनांक : १०/०७/२०२६

( एस. पी. बेदरकर)
सह दिवाणी न्यायाधीश ( व.स्तर), मंगरुळपीर.

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word to word, as per original judgment/order. | | |
| 1) | Name of Stenographer | :- S. V. Dere (Stenographer G-II) |
| 2) | Name of Court | :- Jt. Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 10/07/2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 10/07/2026 |
| 5) | Order uploaded on | :- 10/07/2026 |